# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 20/01/2024 (शनिवार) सायंकाळ

---

## अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीस अटक
## वाहनासह एकुण २५,३०,०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त
## पोलीस स्टेशन भिवापूरची कारवाई

दिनांक १९/०१/२०२४ रोजी रात्री २१.३० वा. दरम्यान पोलीस भिवापूर येथील स्टाफ पोलीस स्टेशन भिवापूर हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांना बस स्टॉप भिवापुर येथे मुखबिरद्वारे माहीती मिळाली की, निलज फाटा कडुन भिवापुर कडे एक टिप्पर मध्ये अवैद्यरित्या विनापरवाना रेती (वाळु) घेवुन जात आहे. अशा बातमीवरुन तहसिल टी पाईन्ट भिवापुर जवळ हायवे रोडवर भिवापुर कडुन उमरेडकडे १० चक्का टिप्पर क्र. एम. एच. —४०/सी. एम.— ११११२ संशयितरित्या येतांना दिसल्याने टिप्पर चालक **आरोपी नामे—१) नितीन ज्ञानेश्वर वाढई वय ३२ वर्ष रा. मांगली ता. उमरेड जि. नागपुर** यास टिप्पर थांबण्याचा इशारा केला असता चालकाने टिप्पर रोडचे कडेला थांबवुन चालकास टिप्पर मध्ये काय लोड आहे. याबाबत विचारणा केली असता टिप्पर चालकाने रेती (वाळु) भरून असल्याबाबत सांगितल्याने टिप्परची तपासणी केली असता टिप्पर मध्ये अंदाजे ०६ ब्रास रेती अवैधरित्या विनापरवाना शासनाचा महसुल बुडवुन तसेच सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करुन व सरकारी खनिज रेती (वाळु) ची चोरटी वाहतुक करतांना टिप्पर चालक हा आढळून आल्याने टिप्पर चालकास रेती बाबत परवाना (रॉयल्टी) विचारपुस केली असता परवाना नसल्याचे सांगितले. टिप्पर मालक नामे— प्रतिक विध्वंस रा. नागपुर यांचे सांगणेवरुन सदर टिप्पर मध्ये रेती भरुन आणल्याबाबत सांगितल्याने आरोपीचे ताब्यातून १० चक्का टिप्पर क्र. एम. एच. —४०/सी. एम.— ११११२ किंमती २०,००,०००/— रुपये व त्यामध्ये ०६ ब्रास रेती प्रत्येकी ५०००/— रुपये ब्रास प्रमाणे एकुण ३००००/— रुपये असा एकुण २०,३०,०००/— रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. यातील आरोपी चालक यास अटक करण्यात आली आहे. दोन्ही आरोपी विरुद्ध पोस्टे भिवापूर येथे कलम ३७९, १०९ भादवी ४८(७), ४८(८) महा. जमिन महसुल अधिनियम १९६६ सहकलम ४, २१ खानी आणि खनिजे (विकास आणि नियमन) अधि. १९५७ सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंधक १९८४ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कारवाई ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर (ग्रामीण) श्री. हर्ष पोद्दार (भा.पो.से.) तसेच अपर पोलीस अधीक्षक डॉ. श्री. संदीप पखाले यांचे मार्गदर्शनात मा. उपविभागीय पोलीस अधिकारी उमरेड विभाग, सहायक पोलीस निरीक्षक प्रमोद चौधरी, पोलीस उपनिरीक्षक सदमेक, पोलीस हवालदार प्रफुल माहुरे, पोलीस अंमलदार वाघमारे, रवी वानखेडे, चालक अविनाश सोरते यांनी केली.




## कोळसा चोरी

**पोस्टे कन्हान :—** अंतर्गत ०६ किमी अंतरावर खदान नं ०३ डंपींग यार्ड जवळ दिनांक १९/०१/२०२४ चे १३.४६ वा. दरम्यान फिर्यादी नामे— देवीप्रसाद बाबूलाल देवीया, वय ३५ वर्ष, रा. इंदर कॉलनी खदान नं ०६ हा डब्ल्यू सीएल खदान येथे सिक्यूरीटी गार्ड डयुटीवर हजर असता दुपारी १/४६ वा. दरम्यान फोन आला की मारोती ८०० कार क्र. एम. एच.— २७/डी— १२५३ मध्ये चोरीचा कोळसा मढीबाबा काली माता मंदीर पासून जात आहे. अश्या मिळालेल्या माहीती वरून फिर्यादीच्या साथीला फोन करून बोलावुन डब्ल्यू सीएलची पेट्रोलींग गाडीत बसून पेट्रोलींग करीत असता मारोती ८०० कार क्र. एम. एच.—२७/डी— १२५३ गाडीला अडवून त्यामध्ये ४०० किलो कोळसा किंमती २०००/—रू चोरून नेतांना मिळून आला १) मारोती ८०० कार क्र. एम. एच.—२७/डी— १२५३ किंमती ३००००/—रू. २) अंदाजे ४०० किलो कोळसा किंमती २०००/—रू. चा मुद्देमाल असा एकूण ३२०००/—रू. चा मुद्देमाल **आरोपी नामे— सोहेल खान रा. खदान नं. ०३** याने चोरी करून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार सहारे पोस्टे कन्हान हे करीत आहे.

## घरफोडी

**१) पोस्टे बोरी:–** अंतर्गत तुलसी सिटी प्लॉट नं. ३७, उमरेड बायपास बुट्टीबोरी येथे दिनांक १८/०१/२०२४ चे रात्री १०.०० वा. ते दिनांक १९/०१/२०२४ चे ०७.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– रमाकांत देवाक्षय शर्मा, वय ६० वर्ष, कंपनी सुपरवायझर रा. तुलसी सिटी प्लॉट नं. ३७, उमरेड बायपास बुट्टीबोरी ता. जि. नागपुर व त्याचा परिवार हा कामानिमित्त घराला कुलुप लावून बाहेर गावी गेला होता. फिर्यादी हा परत आला असता घराचे कुलूप तुटलेले दिसले व घरात जावून पाहिले असता यातील बेडरुम मध्ये असलेल्या लोखंडी व लाकडी कपाट उघडे दिसले व कपाटातील सामान अस्ताव्यस्त बेडरुम मध्ये फेकुन दिसले फिर्यादीने दोन्ही कपाटाची बारकाईने पाहणी केली तर कपाटात ठेवलेले दागीणे व नगदी रुपये चोरीला गेल्याचे दिसुन आले. १) लाकडी कपाटात ठेवलेले नगदी ४०,०००/– रु २) २ नग कंबरपट्टा वजन अंदाजे ४०० ग्रॅम किंमती १०,०००/– रु ३) २ जोडी पायल चांदिच्या वजन १०० ग्रॅम किंमती २,५००/–रु व लोखंडी ४) कपाटातुन ४ नग चांदीचे बिछिया वजन १० ग्रॅम किंमती २५०/– रु ५) देवघरातील २ चांदीचे सिक्के वजन २० ग्रॅम किंमती ५००/–रु, एकुण नगदी ४०,०००/– रु व चांदीचे दागीने ५३० ग्रॅम किंमती १३,२५०/– रु असा एकुण ५३२५०/–रु चा मुद्देमाल कुणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. बोरी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५४, ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर घटनास्थळी सहायक पोलीस निरीक्षक मेश्राम यांनी भेट दिली असुन गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक मेश्राम पो.स्टे बोरी मो. नं. ९९२३७९८६८८ हे करीत आहे.

**२) पोस्टे कळमेश्वर :–** अंतर्गत ११ किमी अंतरावर मौजा निमजा शिवार येथे दिनांक १८/०१/२०२४ चे १८.०० वा. ते दिनांक १९/०१/२०२४ चे १२.०० वा. दरम्यान निमजी शिवार ता. कळमेश्वर येथे स्वामी बेलखंडे बाबा यांचे मंदिर असुन फिर्यादी नामे– अरुण विठ्ठल भोयर, वय ५९ वर्षे हा त्या मंदिरात देखरेख ठेवण्याचे काम करित असतो. दिनांक १८/०१/२०२४ चे १८/०० वा. ते दिनांक १९/०१/२०२४ चे १२/०० वा. दरम्यान कोणीतरी अज्ञात आरोपीने मंदिराचे लॉक तोडुन मंदिरामधील १) चांदिचे मुकुट ३ नग वजन १५ तोळे किंमती ६०००/– रुपये २) चांदिची गोल छत्री १ नग वनज २ तोळे किंमती २००० रुपये ३) सोन्याची नथ २ नग वजन अर्धा ग्राम किंमती २०००/– रुपये ४) सोन्याच्या धाग्यातील डोरल १ नग किंमती २०००/– रुपये ५) डब्यामध्ये ठेवलेले अंदाजे १५०० रुपये नगदी असा एकुण १३,५००/– रुपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात आरोपीने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कळमेश्वर येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५४, ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर घटनास्थळी सहायक पोलीस निरीक्षक तेजराम मेश्राम यांनी भेट दिली असुन गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक तेजराम मेश्राम मो. नं. ९०७५२४५०५९ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**